**कृषी उन्नती योजना-एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (MIDH) अंतर्गत सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाचा पहिल्या हप्त्याचा निधी वितरित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: राफअ-२०२६/प्र.क्र.१००/९-अे,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- २२ मे, २०२६

संदर्भ:-

१. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.एमआयडीएच/२०१४/प्र.क्र.८२/९-अे,दि. ३० मे, २०१४
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र. ४०/अर्थ-३, दिनांक ०९ एप्रिल, २०२६
३. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र. ४०/अर्थ-३, दिनांक ०७ मे, २०२६
४. आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०२६/प्र.क्र.६१/कार्यासन-६, दि.१३ मे, २०२६
५. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. बीयुडी २०२५/प्र.क्र. १०५/अर्थसंकल्प, दिनांक १९ मे, २०२६.
६. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र:राफअ-२०२६/प्र.क्र.१००/९-अे, दिनांक ०८ मे, २०२६
७. केंद्र शासनाच्या कृषी, सहकार व शेतकरी कल्याण विभागाचे इंग्रजी F.No.१९(MH१३), Dated: २३.०४.२०२६ चे पत्र
८. संचालक, फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, पुणे यांचे जा.क्र. मराफऔवमं/ लेखा/पहिला हप्ता निधी मागणी/६३९/२०२६, दिनांक २७.०४.२०२६ रोजीचे पत्र

प्रस्तावना:-

राज्यात कृषी उन्नती योजना-एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान राबविण्यासाठी संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सन २०२६-२०२७ मध्ये राज्यात कृषी उन्नती योजना-एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान राबविण्यासाठी संदर्भ क्रमांक ६ च्या शासन निर्णयान्वये रुपये १६८३३.३३ लाख एवढ्या निधीच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

केंद्र शासनाकडून संदर्भ क्रमांक ७ येथील पत्रान्वये सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरिताचा पहिल्या हप्त्याचा केंद्र हिस्सा रु. ५०,५०,००,०००/- निधी प्राप्त झाला आहे. त्यानुषंगाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता पहिल्या हप्त्यापोटी केंद्र हिस्सा ४८,५०,००,०००/- (रुपये अठ्ठेचाळीस कोटी पंन्नास लाख फक्त) व त्यास समरूप राज्य हिस्सा ३२,३३,३३,३३४/- (रुपये बत्तीस कोटी तेहतीस लाख तेहतीस हजार तीनशे चौतीस फक्त) असा एकूण रु. ८०,८३,३३,३३४/- (रुपये ऐंशी कोटी त्र्याऐंशी लाख तेहतीस हजार तीनशे चौतीस फक्त) निधी संचालक, फलोत्पादन, कृषि आयुक्तालय पुणे यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

१. राज्यात कृषी उन्नती योजना-एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान सन २०२६-२०२७ मध्ये राबविण्यासाठी पहिल्या हप्त्यापोटी केंद्र हिस्सा रु.४८,५०,००,००० /- (रुपये अठ्ठेचाळीस कोटी पंन्नास लाख फक्त) व त्याला समरुप राज्य हिस्सा रु. ३२,३३,३३,३३४/- (रुपये बत्तीस कोटी तेहत्तीस लाख तेहत्तीस हजार तीनशे चौत्तीस फक्त) असा एकूण रु. ८०,८३,३३,३३४/- (रुपये ऐंशी कोटी त्र्याऐंशी लाख तेहतीस हजार तीनशे चौतीस फक्त) एवढा निधी संचालक, फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, पुणे यांना वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर निधीचा प्रवर्गनिहाय तपशील पुढीलप्रमाणे :

| | सर्वसाधारण | अनु. जाती | अनु. जमाती | एकूण |
|---|---|---|---|---|
| केंद्र हिस्सा | ३८,२३,४१,०००.०० | ५,७२,९८,०००.०० | ४,५३,६१,०००.०० | ४८,५०,००,०००.०० |
| राज्य हिस्सा | २५,४८,९४,०००.०० | ३,८१,९८,६६७.०० | ३,०२,४०,६६७.०० | ३२,३३,३३,३३४.०० |
| **एकूण** | **६३,७२,३५,०००.००** | **९,५४,९६,६६७.००** | **७,५६,०१,६६७.००** | **८०,८३,३३,३३४.००** |

२. या अभियानाकरिता वितरित करण्यात येणारा निधी कोषागारातून आंहरित करण्याकरिता सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आंहरण व संवितरण अधिकारी म्हणून आणि संचालक, (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर निधी खालील लेखाशिर्षांतर्गत सन २०२६-२०२७ साठी अर्थसंकल्पित केलेल्या तरतूदीतून खर्ची टाकण्यात यावा.

| प्रवर्ग | केंद्र हिस्सा (६० टक्के) | राज्य हिस्सा (४० टक्के) |
|---|---|---|
| सर्वसाधारण | मागणी क्र. - डी -०३<br>२४०१ - पीक संवर्धन<br>(००) (११९) - फलोत्पादन व भाजीपाला पिके<br>(०३) (३७) - कृषि उन्नती योजना -एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (कें.पु.यो.)<br>(केंद्र हिस्सा ६० टक्के) (सर्वसाधारण)<br>३३-अर्थसहाय्य (२४०१ ९५६३) | मागणी क्र. - डी -०३<br>२४०१ - पीक संवर्धन<br>(००)(११९) - फलोत्पादन व भाजीपाला पिके<br>(०३) (३४) - कृषि उन्नती योजना -एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (कें.पु.यो.)<br>(राज्य हिस्सा ४० टक्के) (सर्वसाधारण)<br>३३ - अर्थसहाय्य (२४०१ ४५०७) |
| अनुसुचित जाती | मागणी क्र. - एन -०३<br>२४०१ - पीक संवर्धन<br>(००)(७८९)- अनुसूचित जातीसाठी विशेष घटक योजना<br>(०१) अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना<br>(०१) (०१) -कृषि उन्नती योजना- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (अनुसूचित जाती) (कें.पु.यो.) (केंद्र हिस्सा ६० टक्के)<br>३३-अर्थसहाय्य (२४०१B०८१) | मागणी क्र. - एन -०३<br>२४०१ - पीक संवर्धन<br>(००) (७८९)-अनुसूचित जातीसाठी विशेष घटक योजना<br>(०१) अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना<br>(०१) (०२) -कृषि उन्नती योजना- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (अनुसूचित जाती) (कें.पु.यो.) (राज्य हिस्सा ४० टक्के)<br>३३ -अर्थसहाय्य (२४०१B०९९) |

| | | |
|---|---|---|
| अनुसुचित जनजाती | मागणी क्र.टी - ५,<br>२४०१- पिक संवर्धन<br>७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना<br>०१- जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१) (०६) कृषि उन्नती योजना - एकत्मिक फलोत्पादन विकास अभियान (अनुसूचित जनजाती) (कें.पु.यो.) (केंद्र हिस्सा, ६० टक्के)<br>३३ अर्थसहाय्य (२४०१A०२९) | मागणी क्र.टी - ५,<br>२४०१- पिक संवर्धन<br>७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना<br>०१- जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१) (०७) कृषि उन्नती योजना-एकत्मिक फलोत्पादन विकास अभियान (अनुसूचित जनजाती)(कें.पु.यो.) (राज्य हिस्सा, ४० टक्के)<br>३३ अर्थसहाय्य (२४०१A०११) |

४. या शासन निर्णयान्वये वितरीत निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिकेमध्ये उल्लेख केलेल्या तसेच नियोजन विभाग व वित्त विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, प्रचलित अटी व शर्तीचे तसेच वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

५. सदर प्रकरणी संदर्भाधीन क्रमांक ६ अन्वये निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी.

६. सदर आदेश वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: अर्थसं-२०२६/प्र.क्र. ४०/अर्थ-३, दि.०७ मे, २०२६, सामाजिक न्याय विभागाचे परिपत्रक बीयुडी-२०२५/प्र.क्र.१०५/अर्थसंकल्प, दि. १९ मे, २०२६ व आदिवासी विकास विभागाचे परिपत्रक क्र. बीयुडी-२०२६/प्र.क्र.६१/कार्यासन-६, दि. १३ मे, २०२६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०५२२११०३२९२७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE

Digitally signed by LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept, 2.5.4.20=77EE43FEB646B7AE43865425CA1D67A75CD7607FAEAE62A4E9BAD488155D6D28, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=84E88A84C7D5FA8833BA5D3A151CAF394D94599C220A07BDD761A398EED0AC3E, cn=LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
Date: 2026.05.22 11:04:28 +05'30'

**( ललितकुमार धायगुडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपालाचे सचिव, महाराष्ट्र राज्य.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे अप्पर मुख्य सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
४. मा. मंत्री (फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
५. मा. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद/महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई-०३२
६. सर्व सन्माननीय विधानपरिषद/विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य.
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
८. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

१०.सचिव (कृषि), कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई-०३२

११.सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

१२.सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१३.आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१४.संचालक, (फलोत्पादन), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१५.महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर

१६.सर्व विभागीय कृषी सह संचालक, महाराष्ट्र राज्य.

१७.सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी/तालुका कृषी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.

१८. सहायक संचालक (लेखा-१), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१९.महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता)/लेखा परीक्षा) मुंबई/नागपूर.

२०.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.

२१. संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई.

२२.संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

२३.सह संचालक, लेखा व कोषागरे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई-३२

२४.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य.

२५.कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (कार्यासन क्र. १४३१), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

२६.कक्ष अधिकारी, अर्थसंकल्प (विघयो), सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय, मुंबई-०३२.

२७.कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग (कार्यासन ६), मंत्रालय, मुंबई-०३२.

२८. निवड नस्ती ९-अे.